**महाराष्ट्र शासन**
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २
३०-ब, अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५
दूरध्वनी क्र ०२२-२२१६३३५१ ई-मेल mahapocra@gmail.com

जा. क्र. नादेकृसंप्र २ / समाजशास्त्र/ ग्रा.कृ.वि.स./ प्र. क्र.३४ /२०२५/२०७ दिनांक- २७.०२.२०२५

प्रति,
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
प्रकल्प टप्पा २ मधील सर्व जिल्हे

विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २ अंतर्गत कृषिताई निवड करणे बाबत मार्गदर्शक सूचना.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २ हा जागतिक बँक सहाय्यित प्रकल्प राज्यातील २१ जिल्ह्यांमधील ७२०१ गावांमध्ये राबविण्यास दि. १४.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये गावातील शेतकऱ्यांचा विशेषतः महिलांचा जास्तीत जास्त सहभाग अपेक्षित आहे. शेतकऱ्यांचा विशेषतः महिला शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रकल्पांतर्गत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी प्रकल्पात समाविष्ट प्रत्येक गावामध्ये एक कृषिताई (महिला शेतकरी मित्र) यांची निवड करण्यात यावी.

२. कृषिताई यांची प्रमुख जवाबदारी प्रकल्प, कृषि विभाग, कृषि विज्ञान केंद्र (KVK), ग्राम पंचायत, अल्प व अत्यल्प शेतकरी यांच्यात प्रकल्पाच्या गरजेनुसार दुवा म्हणून काम करणे, हवामान अनुकूल तंत्रज्ञानाची माहिती देणे, महिला शेतीशाळेसाठी महिला शेतकरी / गटांना प्रवृत्त करणे इ. आहे. कृषिताई गावस्तरावर कृषि सहाय्यक, समूह सहाय्यक व स्वयंसेवकांसमवेत काम करेल.

३. प्रकल्पातंर्गत कृषिताईची निवड करणे बाबत मार्गदर्शक सूचना सहपत्रित करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक गावासाठी एका कृषिताईची निवड ग्रामसभेमध्ये करावे. या संदर्भात ग्रामसभेने निवड केलेल्या

कृषिताईच्या ठरावाची सत्यप्रत उपविभागीय कृषि अधिकारी यांनी ग्राम कृषि विकास समितीकडून प्राप्त करून घ्यावी आणि ती त्यांच्या अभिलेख्यात ठेवावी.

४. कृषिताईस वरील जबाबदारी पार पाडण्यासाठी रु १०००/- प्रति माह मानधन DBT प्रणालीवरून देण्यात येईल. कृषिताईची निवड करून त्यांची नोंदणी https://gkvs-ndksp.mahapocra.gov.in/ या पोर्टल वर update करण्याची कृषि सहाय्यक यांनी दक्षता घ्यावी.

Pariwalt 3/3/25

**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प- टप्पा २,**
**मुंबई**

**प्रत, माहितीस्तव:**

१. मा. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग मंत्रालय मुंबई
२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,पुणे
३. संचालक (आत्मा) कृषि आयुक्तालय,पुणे

**प्रत, माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव:**

१. विभागीय कृषि सहसंचालक छत्रपती संभाजी नगर / लातूर/अमरावती/ नागपूर / नाशिक
२. प्रकल्प संचालक (आत्मा), नां.दे.कृ.सं.प्र. टप्पा २ मधील सर्व जिल्हे (२१)
३. उपविभागीय कृषि अधिकारी, नां.दे.कृ.सं.प्र. टप्पा २ मधील सर्व उपविभाग (५५)
   २/- सदर बाब, अध्यक्ष, ग्राम कृषि विकास समिती, नां.दे.कृ.सं.प्र. टप्पा २ मधील सर्व ग्राम पंचायत यांचे निदर्शनास आणावी

## कृषिताईंची निवड करण्याकरिता मार्गदर्शक सूचना

कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. नादेकृ ४६२२/प्रक्र ९४/८ए दि. ३०.६.२३ नुसार जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२, अकोला, अमरावती, छत्रपती संभाजी नगर, बीड, बुलडाणा, हिंगोली, जळगाव, जालना, लातूर, नांदेड, नाशिक, धाराशिव, परभणी, वर्धा, वाशिम, यवतमाळ, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा आणि गडचिरोली या २१ जिल्ह्यांमध्ये राबविण्यासाठी शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे. हवामान बदलास अनुसरून कृषि पद्धतीचा अवलंब करण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करून त्यांची शेती किफायतशीर करणे, हे प्रस्तुत प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

कृषिताईची संकल्पना केंद्र शासनाच्या कृषिमित्र (Farmers Friend) या विस्तार प्रेरक व सामाजिक संचेतक (social mobilizer) म्हणून ग्राम स्तरावर काम करणाऱ्या आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये गावातील शेतकऱ्यांचा विशेषतः महिलांचा जास्तीत जास्त सहभाग अपेक्षित आहे. याकरिता प्रत्येक गावामध्ये एक महिला संचेतक (female community mobiliser) "कृषिताई"ची निवड करावयाची आहे. "कृषिताई" प्रकल्पाचे अधिकारी/ कर्मचारी, कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, ग्राम पंचायत आणि अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी, भूमिहीन यांच्यात दुवा म्हणून काम करेल. याशिवाय हवामान अनुकूल तंत्रज्ञानाची माहिती देणे, महिला शेतीशाळेसाठी महिला शेतकरी/गटांना प्रवृत्त करणे इत्यादी कामे करेल. कृषिताई गावस्तरावर कृषि सहाय्यक, समूह सहाय्यक व स्वयंसेवकां समावेत काम करेल. तसेच प्रकल्प अंमलबजावणी बाबत जनजागृती करण्यासाठी मदत करेल. यासाठी "कृषिताई" ला मानधन देण्यात येणार आहे.

**कृषिताई निवड प्रक्रिया:-**

१. ग्राम कृषि विकास समितीस प्रत्येक प्रकल्प गावात महिला संचेतक म्हणून काम करण्यासाठी कृषिताईची नेमणूक करावयाची आहे.

२. कृषिताईचे निवड ग्रामसभे मध्ये मंजुर करण्यात यावी.

३. ग्राम कृषि विकास समिती मध्ये कृषिताई निमंत्रित सदस्य म्हणून उपस्थित राहील परंतु त्यांना ग्राम कृषि विकास समितीच्या निर्णय प्रक्रियेत मतदानाचा अधिकार असणार नाही.

४. बेचिराख, उजाड, रीठ, नगर पंचायत, आणि प्रकल्प बाधित गावांसाठी कृषिताईची निवड करण्यात येऊ नये.

५. कृषिताईचे निवड करतांना तिचा या पदावर कोणताही नोकरीचा अथवा इतर अधिकार असणार नाही याबाबत लेखी हमी पत्र ( सोबतच्या नमुन्यात) घेण्यात यावे.

६. कृषिताईचे काम समाधानकारक नसल्यास अथवा ती कोणतेही गैरव्यवहार करताना आढळून आल्यास अशा कृषिताईच्या सेवा संपुष्टात आणण्याचे अधिकार ग्रामसभेला राहातील. तद्नंतर नव्याने कृषिताईची निवड करण्यात यावी.

कृषिताईची निवड करताना पात्रतेचे खालील निकष विचारात घेण्यात यावेत.

**कृषिताई पात्रतेचे निकष-**

१. कृषिताई संबंधित गावातील रहिवासी महिला शेतकरी असावी.
२. कृषिताईची शैक्षणिक पात्रता किमान १२ वी पास असावी तरी या पेक्षा उच्च शिक्षित महिलेस प्राधान्य द्यावे. १२ वी पास महिला शेतकरी उपलब्ध न झाल्यास १० वी पास महिला शेतकऱ्यांची निवड करण्यात यावी.
३. ज्या महिला शेतक-यांनी कृषि विषयक प्रशिक्षण घेतले आहे त्यांना प्राधान्य देण्यात यावे
४. कृषि ताईस मराठी भाषेतून वाचन, लेखन व संभाषण करता येणे आवश्यक आहे.
५. कृषि ताईस मोबाईलचा वापर तसेच जुजबी गणित येणे आवश्यक आहे.

**कृषिताईची जबाबदारी**

१. प्रकल्पाचा उद्देश, प्रकल्प घटक व त्याची उपयुक्तता या बाबत गावांतील सर्व सामाजिक स्तरांमध्ये जाणीव- जागृती निर्माण करणे
२. शेतक-यांना हवामान अनुकूल शेती पद्धतींचा अवलंब करण्यास उद्युक्त करणे व त्यासाठी आवश्यक मदत करणे.
३. गावांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, अपंग शेतकरी तसेच भूमिहीन यांना वैयक्तिक लाभासाठी डी. बी. टी. पोर्टल वर अर्ज करण्यासाठी मदत करणे.
४. शेतकऱ्यांच्या शेतीस वारंवार भेटी देऊन हवामान अनुकूल तंत्रज्ञानाची माहिती देणे. किमान ५ शेतकऱ्यांच्या शेतीवर हवामान अनुकूल तंत्रज्ञानाला वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे.
५. प्रकल्पामार्फत राबविण्यात येणाऱ्या महिला शेतीशाळेसाठी महिला शेतकरी / गटांना प्रवृत करणे
६. इतर शेतीशाळा प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिकांदरम्यान शेतकऱ्यांना सहभागी होण्यासाठी महिला शेतकऱ्यांची उपस्थिती राहण्याकरिता प्रोत्साहित करणे.
७. महिला स्वयं सहायता गट/ ग्रामीण पातळीवरील संस्थाची बैठक आयोजित करणे आणि महिला शेतक-यांचे प्रतिनिधीत्व वाढविण्यासाठी मदत करणे
८. गाव पातळीवर स्वयं सहायता समूह/ महिला बचत गट / शेतकरी उत्पादक गटांना भेटी देवून किमान २ गटास कृषि आधारित व्यवसायासाठी प्रोत्साहित करणे.

९. प्रकल्पाचे विविध प्रकल्प ॲप वापरणेसाठी गावातील शेतकऱ्यांना मदत करणे.
१०. ग्राम कृषि विकास समिती बैठकीस उपस्थित राहून शेतक-यांचे विविध प्रश्न मांडणे व शेतक-यांच्या संबंधित बाबी मंजूर करून घेण्यासाठी कृषि सहाय्यक, समूह सहाय्यक व समितीस मदत करणे.
११. कृषि विभाग आणि गावाच्या शेतकरी गटांमध्ये समन्वय साधणे.
१२. ग्राम कृषी विकास समितीच्या बैठकीमध्ये दर महिन्याला प्रगती आढावा सादर करणे.

**कृषिताईचे प्रशिक्षण / क्षमता वृद्धि**

ज्या महिलेची कृषिताई म्हणून निवड होईल अशा महिलेस प्रकल्पा मार्फत प्रशिक्षण व अभ्यास दौरे यामध्ये सहभागी करुन त्यांची कौशल्य विकसित करण्यात येईल. तसेच तालुका स्तरीय बैठका, मेळावे व प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये निमंत्रीत करुन कृषि विस्तार व कृषि विषयक कामाची माहिती गावापर्यंत पोहचविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

- हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण
- तंत्रज्ञान समन्वयकामार्फ़त हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचे शेतीशाळेच्या माध्यमातून प्रशिक्षण
- देशी बियाण्याच्या वाणांच्या संवर्धनाचे प्रशिक्षण
- तृणधान्याची ओळख, पौष्टिक धान्यांचे सेवनामुळे आरोग्याला होणारे फायदे, आणि जनजागृती विषयक प्रशिक्षण
- प्रकल्पा मध्ये वापर होणारे विविध ॲप आणि IT device वापरणे करिता डीजीटल साक्षरता प्रशिक्षण

**निरीक्षण आणि मूल्यांकन प्रक्रिया**

कृषिताईचे कामाचे मूल्यांकन खालील मुद्द्यांचा आधारे करावयाचे आहे.

१. गावांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, अपंग शेतकरी तसेच भूमिहीन यांना वैयक्तिक लाभ घेणे साठी प्रकल्पाचा डी. बी. टी. पोर्टल वर एकूण केलेल्या अर्जांची संख्या
२. शेतकऱ्यांच्या शेतीस वारंवार भेटी देऊन हवामान अनुकूल तंत्रज्ञानाची माहिती देणे आणि किमान ५ शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीत हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे
३. तंत्रज्ञान समन्वयक यांच्यासोबत हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी शेतकऱ्यांना दिलेल्या भेटींची संख्या
४. गाव पातळीवर स्वयं सहायता समूह/ महिला बचत गट / शेतकरी उत्पादक गटांना दिलेल्या भेटींची संख्या
५. ग्राम कृषि विकास समितीची बैठकीतील उपस्थिती (दिवस)
६. शेतीशाळेतील उपस्थिती (दिवस)
७. शेतीशाळेत सहभागी होण्यासाठी उद्युक्त केलेल्या महिला शेतक-यांची संख्या

## कृषिताईने केलेल्या कामाची मानधन प्रदान करण्याची कार्य पद्धती

१. कृषिताईस वरील जबाबदारी पार पाडताना केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मानधन स्वरूपात प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्तरावर उपलब्ध निधीमधून करण्यात येईल.

२. कृषिताईस रु १०००/- प्रति माह याप्रमाणे मानधन देण्यात येईल.

३. https://gkvs-ndksp.mahapocra.gov.in/ या पोर्टल वर कृषिताई यांचे registration करताना त्यांचा आधार लिंक्ड बँक खात्यांचा तपशील घेण्यात येईल, जेणेकरून त्यांना DBT प्रणाली मार्फत दरमहा मानधन अदा करणे शक्य होईल.

४. परिपत्रकाच्या दिनांकांनंतर ग्रामसभेने कृषीताईला निवड केलेल्या दिनांकापासून कृषीताईला मानधन देण्यात यावे.

५. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत कृषिताई यांची मानधनाची शिफारस प्रकल्पाच्ये पोर्टलवर करावी.

६. कृषिताईनी प्रत्यक्ष कामकाज केलेल्या महिन्याच्या पुढील महिन्यात, निधी उपलब्धतेच्या अधीन राहून, १० तारखेपर्यंत प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून मानधन अदा करण्यात येईल.

७. कृषिताईने केलेल्या कामाचा आढावा ग्राम कृषि विकास समितीच्या मासिक बैठकीमध्ये घेण्यात यावा. तसेच प्रकल्प अंमलबजावणीबाबत कृषिताईंकडून प्राप्त सुचना देखील नोंदवून घ्याव्यात.

कृषिताई यांनी कामकाज करत असतांना जर काही समस्या /तक्रारी उदभवल्यास त्यांचे निवारण ग्राम कृषि विकास समितीने करावी.

Pariwalt 3/3/25

प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा २
मुंबई

हमीपत्र

दिनांक:....................

प्रति,
सरपंच तथा अध्यक्ष,
ग्राम कृषि विकास समिती,
..................................

विषय: -नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत कृषिताई म्हणून काम करणेस इच्छुक असलेबाबत...
संदर्भ: ग्राम कृषि विकास समिती................ (गावाचे नाव) ठराव क्र. दिनांक ................

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये माझे निवड कृषिताई म्हणून करण्यात आलेली आहे. सदर सेवांचे स्वरूप आणि कामाचा कालावधी मी समजून घेतला असून मला तो पूर्णत: मान्य आहेत. त्यानुसार मी सदर प्रकल्पांतर्गत माझी सेवा उपलब्ध करून देण्यास संमती कळवीत आहे. हे काम माझ्यासाठी उदरर्निवाहाचे साधन असणार नाही व मला कोणत्याही प्रकारे शासकीय नोकरीसाठी दावा करता येणार नाही याची मला जाणीव आहे. तसेच काही कारणास्तव मला हे काम करणे शक्य नसल्यास एक महिना अगोदर मी लेखी कळविण्याची दक्षता घेईन.

(कृषिताई)
सही:-
नाव:-
पत्ता:-